**दिव्यांगांच्या अनुदानित विशेष शाळा / कार्यशाळा / मतिमंद मुलांचे बालगृहे यांमधील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसाठी राज्याची परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना (DCPS) / राष्ट्रीय निवृत्तीवेतन प्रणाली योजना (NPS).**

कर्मचाऱ्याचा सेवा कालावधीत मृत्यु झाल्यास त्याच्या कुटुंबियांना कुटुंब निवृत्तीवेतन आणि मृत्यु उपदान व रुग्णता सेवानिवृत्त झालेल्या कर्मचाऱ्याला रुग्णता निवृत्तीवेतन आणि सेवानिवृत्ती उपदान तसेच सेवेतून निवृत्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांना सेवानिवृत्ती उपदान मंजूर करणेबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**दिव्यांग कल्याण विभाग,**
**शासन निर्णय क्रमांक : इडीडी-२०२३ / प्र. क्र. १६९/ दि. क. १**

३१, ३२, ३५ ए मित्तल टॉवर, "ए" विंग, तिसरा मजला,
बॅरिस्टर रजनी पटेल मार्ग, नरिमन पॉईंट, मुंबई- ४०००२१.

दिनांक : १२ डिसेंबर, २०२४.

वाचा : १) शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक : अंनियो-१००५ / १२६ / सेवा-४, दिनांक ३१ ऑक्टोबर, २००५,

२) शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक : अंनियो-१००७ / १८ / सेवा-४, दिनांक ७ जुलै, २००७,

३) शासन निर्णय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग क्रमांक : सकआ-२०१२ / प्र. क्र. ४७८ / आस्था-२, दिनांक ९ नोव्हेंबर, २०१२,

४) शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक : अंनियो-२०१२ / प्र. क्र. ९६ / सेवा-४, दिनांक २७ ऑगस्ट, २०१४,

५) शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक : अंनियो-२०१५ / NPS /प्र. क्र. ३२ / सेवा-४, दिनांक ६ एप्रिल, २०१५,

६) शासन निर्णय, वित्त विभाग, अंनियो - २०१७ / प्र. क्र. २९ / सेवा-४, दिनांक २९ सप्टेंबर, २०१८

७) शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक : रानियो-२०२२ / प्र. क्र. ३४ / सेवा-४, दिनांक ३१ मार्च, २०२३,

८) शासन शुद्धीपत्रक, वित्त विभाग क्रमांक : रानियो-२०२२ / प्र. क्र. ३४ / सेवा-४, दिनांक २० एप्रिल, २०२३,

९) शासन परिपत्रक, वित्त विभाग क्रमांक : रानिप्र-२०२३ / प्र. क्र. ५७ / सेवा-४, दिनांक २४ ऑगस्ट, २०२३

१०) शासन निर्णय, दिव्यांग कल्याण विभाग, क्रमांक : इडीडी-२०२२ / प्र. क्र. १६५ / दि. क. १, दिनांक २६ एप्रिल, २०२४.

११) शासन निर्णय, दिव्यांग कल्याण विभाग, क्रमांक : इडीडी-२०२२ / प्र. क्र. ११२ / दि. क. १, दिनांक ४ डिसेंबर, २०२४

**<u>प्रस्तावना :</u>**

दिनांक १ नोव्हेंबर, २००५ रोजी किंवा त्यानंतर राज्य शासनाच्या सेवेत नियुक्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी नवीन परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना संदर्भाधीन क्रमांक १ येथील दिनांक ३१ ऑक्टोबर, २००५ च्या शासन निर्णयान्वये अंमलात आली आहे. या योजनेच्या अंमलबजावणीची कार्यपध्दती संदर्भाधीन क्रमांक २ येथील दिनांक ७ जुलै, २००७ च्या शासन निर्णयान्वये निश्चित करण्यात आली आहे.

२. त्या अनुषंगाने दिनांक १ नोव्हेंबर, २००५ रोजी किंवा त्यानंतर नियुक्त झालेल्या मान्यताप्राप्त व १०० टक्के अनुदानप्राप्त दिव्यांगांच्या विशेष शाळांमधील १०० टक्के अनुदानित पदांवरील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसाठी परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजनेच्या अंमलबजावणीची कार्यपध्दती संदर्भाधीन क्र.३ येथील दिनांक ९ नोव्हेंबर, २०१२ च्या शासन निर्णयान्वये निश्चित करण्यात आली आहे.

३. परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना प्रणाली / राष्ट्रीय निवृत्तीवेतन प्रणाली (NPS) लागू असलेल्या कर्मचाऱ्यांना महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन)नियम, १९८२, महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतनाचे अंशराशीकरण) नियम, १९८४ व सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधीचे लाभ अनुज्ञेय ठरत नाहीत.

४. राज्य शासनाच्या सेवेतील परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन प्रणाली / राष्ट्रीय निवृत्तीवेतन प्रणाली (NPS) लागू असलेल्या कर्मचाऱ्यांचा सेवा कालावधीत मृत्यू झाल्यास त्यांच्या कुटूंबाला कुटुंब निवृत्तीवेतन आणि मृत्यू उपदान व रुग्णता सेवानिवृत्त झालेल्या कर्मचाऱ्याला रुग्णता निवृत्तीवेतन आणि सेवानिवृत्ती उपदान तसेच सेवेतून निवृत्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांना सेवानिवृत्ती उपदान मंजूर करणेबाबतचा निर्णय संदर्भाधीन क्र.७ येथील वित्त विभागाच्या दिनांक ३१ मार्च, २०२३ च्या शासन निर्णयान्वये घेण्यात आलेला आहे.

५. वित्त विभागाच्या संदर्भ क्रमांक-९ येथील दिनांक २४ ऑगस्ट, २०२३ च्या शासन परिपत्रकान्वये, संदर्भ क्रमांक-७ येथील दिनांक ३१ मार्च, २०२३ च्या शासन निर्णयानुसार अनुज्ञेय लाभासंदर्भातील कार्यपद्धती निश्चित करण्यात आली आहे. सदर कार्यपद्धती राज्यातील जिल्हा परिषदा तसेच, मान्यता प्राप्त खाजगी १००% अनुदानित प्राथमिक, माध्यमिक/उच्च माध्यमिक विद्यालये तसेच कृषितर विद्यापिठे व त्यांच्याशी संलग्नित मान्यताप्राप्त व अनुदानित अशासकीय महाविद्यालये तसेच कृषि विद्यापिठे व तत्सम अनुदानित संस्थांमधील १००% अनुदानित पदावरील शिक्षक व शिक्षकेतर पदावर काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी लागू राहील. मात्र याबाबत स्वतंत्र आदेश संबंधित मंत्रालयीन प्रशासकीय विभागांनी निर्गमित करण्याबाबतची कार्यवाही त्यांच्या स्तरावरुन करावी, असे वित्त विभागाने नमूद केले आहे. या सूचनेस अनुसरून राज्यातील दिव्यांगांच्या मान्यता प्राप्त १००% अनुदानित विशेष शाळा/कार्यशाळा/मतिमंद मुलांचे बालगृह यामधील १००% अनुदानित पदावरील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसाठी स्वतंत्र आदेश करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

दिनांक १ नोव्हेंबर, २००५ रोजी किंवा त्यानंतर राज्यातील दिव्यांगांच्या मान्यता प्राप्त १००% अनुदानित विशेष शाळा / कार्यशाळा / मतिमंद मुलांची बालगृहे यांमधील अनुदानित पदावरील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी जो परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना (DCPS) / राष्ट्रीय निवृत्तीवेतन प्रणाली योजनेचा (NPS) सदस्य आहे अशा-

(अ) शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्याचा सेवेत कार्यरत असताना मृत्यु झाल्यास त्याच्या कुटुंबाला कुटुंब निवृत्तीवेतन आणि मृत्यु उपदान,

(आ) रुग्णता सेवानिवृत्त झालेल्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्याला रुग्णता निवृत्तीवेतन आणि सेवानिवृत्ती उपदान लागू करण्यात येत आहे.

त्यानुसार सदर कुटुंब निवृत्तीवेतन धारकास व रुग्णता निवृत्तीवेतन धारकास महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम, १९८२ मधील तरतुदीप्रमाणे कुटुंब निवृत्तीवेतन / रुग्णता निवृत्तीवेतन लागू होईल.

(इ) तसेच १००% अनुदानित शाळा / कार्यशाळा / मतिमंद मुलांचे बालगृहे यांमधील निवृत्त होणाऱ्या शिक्षक /शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना सेवानिवृत्ती उपदान लागू करण्यात येत आहे.

वरील निर्णयानुसार प्रदान करण्यात येणाऱ्या सेवानिवृत्ती उपदान व मृत्यु उपदानाच्या प्रयोजनार्थ सद्य:स्थितीत महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम, १९८२ मधील तरतुदी लागू राहतील.

२. वित्त विभागाच्या संदर्भ क्रमांक-६ येथील दिनांक २९ सप्टेंबर, २०१८ च्या शासन निर्णयान्वये, लागू करण्यात आलेली सानुग्रह अनुदान योजना ही वित्त विभागाच्या संदर्भ क्र. ७ येथील दिनांक ३१ मार्च, २०२३ च्या शासन निर्णयान्वये बंद करण्यात आलेली आहे. तथापि दिनांक २९ सप्टेंबर, २०१८ च्या शासन निर्णयास अनुसरुन सदर योजना १००% अनुदानित शाळा / कार्यशाळा / मतिमंद मुलांचे बालगृहे यांमधील शिक्षक / शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना लागू करण्यात आल्याचे आदेश विभागाकडून निर्गमित करण्यात आलेले नसल्याने सानुग्रह अनुदानासाठी प्राप्त झालेले अर्ज विचारात घेण्यात येऊ नयेत.

३. दिनांक १ नोव्हेंबर, २००५ ते या शासन निर्णयाच्या दिनांकापर्यंत मृत्यु पावलेल्या कर्मचाऱ्यांच्या कुटुंबास मृत्यु उपदान, कुटुंब निवृत्तीवेतनाची थकबाकी तसेच नियमित कुटुंब निवृत्तीवेतन मिळण्यासाठी सदर शासन निर्णयासोबतच्या नमुना-३ मधील विकल्प, कार्यालय प्रमुखाकडे सादर करावा लागेल. त्यानुसार कुटुंब निवृत्तीवेतन धारकास त्याला मिळालेल्या परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना प्रणाली अंतर्गत / राष्ट्रीय निवृत्तीवेतन प्रणाली योजनेंतर्गत (NPS) शासनाच्या अंशदानाचे व्याज / लाभांशासह रक्कम समायोजित करण्याच्या अटीवर कुटुंब निवृत्तीवेतनाचा लाभ अनुज्ञेय होईल. सदर रक्कम समायोजित झाल्यानंतर कुटुंब निवृत्तीवेतन धारकास नियमितपणे कुटुंबनिवृत्तीवेतन अनुज्ञेय राहील.

४. परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना प्रणाली / राष्ट्रीय निवृत्तीवेतन प्रणाली योजनेंतर्गत (NPS) सध्या कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्याने शासन निर्णयाच्या दिनांकानंतर सेवेत असताना मृत्यु झाल्यास किंवा रुग्णता सेवानिवृत्त झाल्यास, महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन)

नियम, १९८२ प्रमाणे कुटुंब निवृत्तीवेतन किंवा रुग्णता निवृत्तीवेतन अनुज्ञेय करण्याबाबतचा सोबतचा नमुना-२ मध्ये विकल्प, कार्यालय प्रमुखाकडे सादर करावा.

५. जे शासकीय कर्मचारी महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम, १९८२ प्रमाणे कुटुंब निवृत्तीवेतन किंवा रुग्णता निवृत्तीवेतन अनुज्ञेय करण्याबाबतचा विकल्प सादर करतील, त्यांनी नमुना-१ प्रमाणे कुटुंबाचा तपशील सादर करणे अनिवार्य आहे.

६. परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना प्रणाली / राष्ट्रीय निवृत्तीवेतन प्रणाली योजना (NPS) लागू असलेल्या सर्व कर्मचाऱ्यांनी शासन निर्णयाच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत वरिल परिच्छेद-४ प्रमाणे विकल्प देणे बंधनकारक राहील. तसेच यापुढे नियुक्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांनी उपरोक्त प्रमाणे विकल्प नियुक्त झाल्यावर ८ दिवसात देणे आवश्यक राहील.

७. वित्त विभागाच्या दिनांक २४ ऑगस्ट, २०२३ च्या शासन परिपत्रकातील तरतूदींस अनुसरुन, परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना प्रणाली / राष्ट्रीय निवृत्तीवेतन प्रणाली योजना (NPS) लागू असलेल्या दिव्यांगांच्या मान्यता प्राप्त १००% अनुदानित विशेष शाळा / कार्यशाळा / मतिमंद मुलांचे बालगृह यामधील १००% अनुदानित पदावरील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्याचा सेवा कालावधीत मृत्यु झाल्यास त्याच्या कुटुंबियांना कुटुंब निवृत्तीवेतन आणि मृत्यु उपदान व रुग्णता सेवानिवृत्त झालेल्या कर्मचाऱ्याला रुग्णता निवृत्तीवेतन आणि सेवानिवृत्ती उपदान तसेच शासन सेवेतून निवृत्त झालेल्या / होणाऱ्या कर्मचाऱ्यांना सेवानिवृत्ती उपदान अनुज्ञेय करण्याबाबतची कार्यपद्धती खालीलप्रमाणे निश्चित करण्यात येत आहे.

अ) परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना / राष्ट्रीय निवृत्तीवेतन प्रणाली योजनेंतर्गत (NPS) असलेल्या कर्मचाऱ्याच्या मृत्युपश्चात त्याचे कुटुंबाने शासन निर्णयासोबतच्या नमुना-३ अन्वये महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम, १९८२ प्रमाणे कुटुंब निवृत्तीवेतनाचा लाभ मिळण्याबाबत विकल्पाची निवड केली असल्यास त्यानुषंगाने कुटुंब निवृत्तीवेतन आणि मृत्यु उपदान अनुज्ञेय करण्यासाठी सोबत जोडलेल्या परिशिष्ट "१" प्रमाणे कार्यवाही करावी.

आ) परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना / राष्ट्रीय निवृत्तीवेतन प्रणाली योजनेंतर्गत (NPS) दिनांक १ नोव्हेंबर, २००५ ते शासन निर्णयाच्या दिनांकापर्यंत रुग्णता निवृत्त झालेला कर्मचारी किंवा मृत झालेला कर्मचाऱ्याचे कुटुंबिय, महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम, १९८२ प्रमाणे रुग्णता निवृत्तीवेतन / कुटुंब निवृत्तीवेतन मिळण्यास पात्र ठरत असल्यास व सदर कर्मचाऱ्याने / मृत कर्मचाऱ्याच्या कुटुंबाने महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम, १९८२ प्रमाणे लाभ देण्याबाबतच्या विकल्पाची नमुना-३ अनुसार निवड केली असल्यास, त्यानुषंगाने रुग्णता निवृत्तीवेतन आणि सेवानिवृत्ती उपदान किंवा कुटुंब निवृत्तीवेतन व मृत्यु उपदान अनुज्ञेय करण्यासाठी सोबत जोडलेल्या परिशिष्ट "१" प्रमाणे कार्यवाही करावी.

इ) परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना / राष्ट्रीय निवृत्तीवेतन प्रणाली योजनेंतर्गत (NPS) शासन निर्णयाच्या दिनांकानंतर सेवेत असताना रुग्णता निवृत्त झालेला कर्मचारी किंवा मृत झालेला कर्मचाऱ्याचे कुटुंबिय, महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम,

१९८२ प्रमाणे रुग्णता निवृत्तीवेतन / कुटुंब निवृत्तीवेतन मिळण्यास पात्र ठरत असल्यास व सदर कर्मचाऱ्याने महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम, १९८२ प्रमाणे लाभ देण्याबाबतच्या विकल्पाची नमुना-२ अनुसार निवड केली असल्यास, त्यानुषंगाने रुग्णता निवृत्तीवेतन आणि सेवानिवृत्ती उपदान किंवा कुटुंब निवृत्तीवेतन व मृत्यु उपदान अनुज्ञेय करण्यासाठी सोबत जोडलेल्या परिशिष्ट "२" प्रमाणे कार्यवाही करावी.

ई) परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना / राष्ट्रीय निवृत्तीवेतन प्रणाली योजनेंतर्गत (NPS) असलेल्या ज्या कर्मचाऱ्याने त्याचा सेवेत असताना मृत्यु झाल्यास किंवा तो रुग्णता सेवानिवृत्त झाल्यास यथास्थिती त्याच्या कुटुंबाला कुटुंब निवृत्तीवेतन / रुग्णता निवृत्तीवेतन अनुज्ञेय करण्याचा विकल्प नमुना-२ मध्ये सादर केला आहे, अशा कर्मचाऱ्याला तो सेवानिवृत्त होईपर्यंत सदरचा विकल्प बदलण्याची मुभा असेल. कर्मचाऱ्याने वेळोवेळी सादर केलल्या विकल्पाची नोंद आहरण व संवितरण अधिकाऱ्याने कर्मचाऱ्याच्या सेवापुस्तकात तत्परतेने घ्यावी. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या संदर्भ क्र. ३ येथील दिनांक ९ नोव्हेंबर, २०१२ अन्वये प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण यांना उपराज्य देखभाल अभिकरण म्हणून परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजनेसंबंधीचे लेखे व इतर संबंधित अभिलेख यांची देखभाल करण्यासाठी नियुक्त करण्यात आले आहे. सबब सदर विकल्पाची व त्याची नोंद घेतलेल्या सेवापुस्तकाच्या पानाची साक्षांकित सत्यप्रत अधिदान व लेखा अधिकारी / जिल्हा कोषागार अधिकाऱ्यामार्फत उपराज्य अभिलेख देखभाल अभिकरणाकडे अभिलेखासाठी पाठवावी. विकल्प देणे हा कर्मचाऱ्याचा अधिकार असल्यामुळे कर्मचाऱ्याने तो हयात असताना दिलेला विकल्प, त्याच्या मृत्युपश्चात त्याच्या कुटुंबियांना कोणत्याही परिस्थितीत बदलता येणार नाही.

उ) महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम, १९८२ मधील नियम १३२ मध्ये नमूद केल्यानुसार "**शासनाला येणे असलेल्या रकमा**" प्रथमत: सेवानिवृत्ती उपदान / मृत्यु उपदान यामधून वसूल करण्यात याव्यात.

ऊ) शासनाच्या सेवेतून निवृत्त झालेल्या / होणाऱ्या कर्मचाऱ्यांचा सेवानिवृत्ती उपदानाचा प्रस्ताव सोबतच्या नमुन्यात (Form-2) भरून मूळ सेवापुस्तकासह उपदानाच्या मंजूरीसाठी महालेखापाल कार्यालयास सादर करण्यात यावा. महालेखापाल कार्यालयाकडून प्रकरण मंजूर झाल्यानंतर प्रचलित पद्धतीने उपदान अदा करणेबाबत आहरण व संवितरण अधिकाऱ्यांनी कार्यवाही करावी. सद्यस्थितीत महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम, १९८२ मधील तरतूदीनुसार सेवानिवृत्ती लाभाची प्रकरणे वित्त विभागाच्या क्रमांक : सेनिवे-२०१४ / प्र. क्र. ३६ / सेवा-४, दिनांक २ जुलै, २०१५ च्या शासन निर्णयाप्रमाणे महालेखापाल कार्यालयाकडे ऑनलाईन पद्धतीने सादर केली जातात. प्रचलित कार्यपद्धतीप्रमाणे परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना प्रणाली / राष्ट्रीय निवृत्तीवेतन प्रणाली योजनेंतर्गत (NPS) सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचे सेवानिवृत्ती उपदानाचे प्रस्ताव ऑनलाईन कार्यपद्धतीने सादर करण्यासाठी समाज सेवार्थ प्रणालीमध्ये आवश्यक फेरफार करण्यास लागणारा कालावधी विचारात घेता, सद्यस्थितीत प्रस्तुत शासन निर्णयाच्या अनुषंगाने सादर करण्यात येणारे सेवानिवृत्ती

उपदानाचे प्रस्ताव महालेखापाल कार्यालयाकडे ऑफलाईन पद्धतीने सादर करावेत. तथापि, सदर शासन निर्णयास अनुसरुन मंजूर करण्यात येणारे कुटुंब निवृत्तीवेतन व मृत्यु उपदान / रुग्णता निवृत्तीवेतन व सेवानिवृत्ती उपदान याबाबतचे प्रस्ताव वित्त विभागाच्या उक्त दिनांक २ जुलै, २०१५ च्या शासन निर्णयानुसार ऑनलाईन पद्धतीनेच सादर करण्यात यावेत.

८. सदर शासन निर्णय, वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक १०४ / २४ / सेवा-४, दिनांक २७ सप्टेंबर, २०२४ अन्वये देण्यात आलेल्या मान्यतेस अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे. तसेच शासन निर्णयासोबतच्या परिशिष्ट-१ मधील परिच्छेद-अ) १.५ खालील तक्त्यामध्ये दर्शविण्यात आलेली जमेची लेखाशीर्षे प्रधान महालेखापाल (लेखा व अनुज्ञयेता)-१, कार्यालय, महाराष्ट्र यांच्या पत्र क्र. सं. ख. वि. / चा-१ / दिव्यांग कल्याण विभाग / युओआर १९९ / २०२४-२५ / १५९८, दिनांक २७ नोव्हेंबर, २०२४ अन्वये दिलेल्या मान्यतेस अनुसरुन निर्माण करण्यात येत आहेत.

९. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२४१२१२१३१५४४८९३५ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

RAJESH BHASKAR GAIKWAD

Digitally signed by RAJESH BHASKAR GAIKWAD
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=PERSONS WITH DISABILITIES WELFARE DEPARTMENT, 2.5.4.20=5b1378a498cdff3fdd9ea5370b71fae3eca97e85924d0e443758ade5f0221f9a, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=26E171EC96C63F6333217D12FB6DA1C5A800CE18A7A6FD59ABF19B8ED3F02A91, cn=RAJESH BHASKAR GAIKWAD
Date: 2024.12.12 13:22:02 +05'30'

**( रा. भा. गायकवाड )**
**अवर सचिव**

प्रत :

१) प्रधान महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१, महाराष्ट्र, मुंबई,
२) प्रधान महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-२, महाराष्ट्र, नागपुर,
३) प्रधान महालेखापाल (लेखापरीक्षा)-१, महाराष्ट्र, मुंबई,
४) प्रधान महालेखापाल (लेखापरीक्षा)-२, महाराष्ट्र, नागपुर,
५) आयुक्त, दिव्यांग कल्याण, पुणे,
६) संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई,
७) सहसंचालक, राज्य अभिलेख देखभाल अभिकरण, मुंबई,
८) अधिदान व लेखा अधिकारी, वांद्रे (पूर्व), मुंबई,
९) मुख्य लेखापरिक्षक, स्थानिक निधी लेखा, कोकण भवन, बेलापुर, नवी मुंबई,
१०) सह संचालक, स्थानिक निधी लेखा, मुंबई / पुणे / नागपुर / औरंगाबाद / अमरावती / ठाणे,
११) सर्व प्रादेशिक उप आयुक्त, समाज कल्याण विभाग,
१२) अवर सचिव, वित्त विभाग कार्यासन व्यय-१४ / सेवा-४ / अर्थसंकल्प-७, मंत्रालय, मुंबई,
१३) निवासी लेखापरिक्षा अधिकारी, मुंबई,
१४) सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
१५) सर्व सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण विभाग,
१६) सर्व जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद,
१७) निवड नस्ती.

दिव्यांग कल्याण विभाग, शासन निर्णय क्रमांक :इडीडी / २०२३-प्र .क्र/ १६९ . दि१-.क., दिनांक १२ डिसेंबर, २०२४ सोबतचे सहपत्र.

## नमुना १

## कुटुंबाचा तपशील

शिक्षक /शिक्षकेतर कर्मचाऱ्याचे नांव : -------------------------

पदनाम : -------------------------

जन्म तारीख : -------------------------

नियुक्तीचा दिनांक : -------------------------

.......... रोजी माझ्या कुटुंबात* असलेल्या सदस्यांचा तपशील

| अ.क्र. | कुटुंबातील सदस्याचे नाव* | जन्मतारीख | कर्मचाऱ्याशी असलेले नाते | कार्यालय प्रमुखाची सही | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| २ | | | | | |
| ३ | | | | | |
| ४ | | | | | |

वरील तपशिलात कोणतीही भर पडल्यास किंवा फेरबदल झाल्यास त्यासंबंधीची माहिती कार्यालय प्रमुखास / लेखापरीक्षा अधिकाऱ्यास कळवून हा तपशील अद्यावत ठेवण्याची मी याद्वारे हमी घेतो.

ठिकाण :

दिनांक : **कर्मचाऱ्याची सही :**

*या प्रयोजनासाठी कुटुंब याचा अर्थ, महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम, १९८२ यातील नियम ११६(१६) (बी) यात व्याख्या केल्याप्रमाणे असलेले “कुटुंब” असा होतो.

टीप- पत्नी व पती यामध्ये अनुक्रमे **न्यायिक** फारकत घेतलेल्या पत्नीचा व पतीचा समावेश होतो.

दिव्यांग कल्याण विभाग, शासन निर्णय क्रमांक :इडीडी / २०२३-प्र .क्र/ १६९ . दि१-.क.,
दिनांक १२ डिसेंबर ,२०२४ सोबतचे सहपत्र.

## नमुना २

**शासन निर्णयाच्या दिनांकानंतर सेवेत असताना रुग्णता सेवानिवृत्त होणाऱ्या / मृत्यु पावणाऱ्या १००% अनुदानित पदावरील शिक्षक/शिक्षकेतर कर्मचाऱ्यास / कुटुंबियास अनुज्ञेय लाभ मिळण्याबाबत**

### विकल्प “अ”

मी . . . . . . . . . . . .. . . . . . . . . . . . याद्वारे विकल्प देत आहे की, १००% अनुदानित शाळा / कार्यशाळा / मतिमंद मुलांचे बालगृह यांमधील १००% अनुदानित पदावर सेवेत असताना रुग्णतेमुळे सेवेकरिता असमर्थ ठरल्यास/मृत्यु पावल्यास मला/ माझ्या कुटुंबास महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम, १९८२ अनुसार लाभ देण्यात यावेत.

अथवा

### विकल्प “ब”

मी . . . . . . . . . . . .. . . . . . . . . . . . याद्वारे विकल्प देत आहे की, १००% अनुदानित शाळा / कार्यशाळा / मतिमंद मुलांचे बालगृह यांमधील १००% अनुदानित पदावर सेवेत असताना रुग्णतेमुळे सेवेकरिता असमर्थ ठरल्यास/मृत्यु पावल्यास मला/माझ्या कुटुंबास परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन प्रणाली / राष्ट्रीय निवृत्तीवेतन प्रणाली अनुसार लाभ देण्यात यावेत.

कर्मचाऱ्याची स्वाक्षरी :
नाव:
पदनाम :
कार्यालयाचे नाव व पत्ता :
DCPS NO :

ठिकाण :
दिनांक :

हा विकल्प दिल्यामुळे यापूर्वी दिलेला विकल्प रद्द समजण्यात यावा.

*आवश्यक नसेल ते खोडावे.

---

### कार्यालय प्रमुख यांनी भरावे.

विकल्प प्राप्त झाल्याचा दिनांक . . . . . . . . . . .

श्री/श्रीम . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . पदनाम . . . . . . . . . . . हे १००% अनुदानित शाळा / कार्यशाळा / मतिमंद मुलांचे बालगृह यांमधील शिक्षक/शिक्षकेतर कर्मचारी असून त्यांनी विकल्प “अ” अथवा “ब” पैकी . . . . . . . . . . . . . . . हा विकल्प स्विकारला आहे. याबाबतचा नोंद सेवापुस्तकामधील पृ.क्र. /प.वि.वर घेण्यात आली आहे.

**कार्यालय प्रमुखाची सही व शिक्का**

टीप : विकल्प स्विकारल्याची प्रत संबंधित कर्मचाऱ्यास देण्यात यावी.

**नमुना ३**

**परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना / राष्ट्रीय निवृत्तीवेतन प्रणाली लागू असलेल्या व दिनांक १ नोव्हेंबर, २००५ ते शासन निर्णयाच्या दिनांकापर्यंतच्या कालावधीत रुग्णता सेवानिवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांनी /मृत्यू झालेल्या कर्मचाऱ्यांच्या कुटुंबियांनी द्यावयाचा विकल्प**

मी, . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . याद्वारे विकल्प देत आहे की, मला परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन प्रणाली / राष्ट्रीय निवृत्तीवेतन प्रणाली अंतर्गत लाभ देण्यात यावेत.

अथवा

मी, . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . याद्वारे विकल्प देत आहे की, मला महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम, १९८२ अंतर्गत लाभ देण्यात यावेत. सदर लाभ अनुज्ञेय करताना परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना प्रणाली / राष्ट्रीय निवृत्तीवेतन प्रणाली अंतर्गत देण्यात आलेले लाभ व परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना प्रणाली / राष्ट्रीय निवृत्तीवेतन प्रणाली अंतर्गत शासनाच्या अंशदानाची व्याज / लाभांशासह रक्कम समायोजित करण्यात यावी.

**रुग्णता निवृत्त झालेल्या कर्मचाऱ्याची स्वाक्षरी/**
**कुटुंब निवृतीवेतनधारकाची स्वाक्षरी**

**दिव्यांग कल्याण विभाग, शासन निर्णय क्रमांक : इडीडी -२०२३ / प्र. क्र. १६९ / दि.क.-१, दिनांक १२ डिसेंबर, २०२४ सोबतचे परिशिष्ट.**

## परिशिष्ट - १

परिभाषित अंशदान निवृत्तिवेतन योजना / राष्ट्रीय निवृत्तीवेतन प्रणाली लागू असलेल्या व दिनांक १ नोव्हेंबर, २००५ ते या शासन निर्णयाच्या दिनांकापर्यंतच्या कालावधीत मृत्यु झालेल्या कर्मचाऱ्याचे कुटुंब / रुग्णता निवृत्त झालेला कर्मचारी महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तिवेतन) नियम, १९८२ अंतर्गत कुटुंब निवृत्तिवेतन अनुज्ञेय करणे / रुग्णता निवृत्तीवेतनास पात्र ठरल्यास व या विकल्पाची (नमुना-३ नुसार) निवड केली असल्यास सदर विकल्पास अनुसरुन अवलंबवयाची कार्यपध्दती.

अ) **परिभाषित अंशदान निवृत्तिवेतन योजना लागू असलेले कर्मचारी**

१. **परिभाषित अंशदान निवृत्तिवेतन योजनेअंतर्गत अंशदान व त्यावरील जमा व्याजाच्या रकमेचा परतावा करण्यात आलेल्या प्रकरणी अनुसरावयाची कार्यपध्दती :-**

१.१ मृत कर्मचाऱ्याच्या कुटुंबास / कायदेशीर वारसास तसेच रुग्णता निवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यास दिव्यांग कल्याण विभागाच्या वाचा-१० येथील दिनांक २६ एप्रिल, २०२४ च्या शासन निर्णयानुसार परिभाषित अंशदान निवृत्तिवेतन योजने अंतर्गत अंशदान व त्यावरील जमा व्याजाच्या रकमेचा परतावा करण्यात आला असल्यास, याबाबत कार्यालय प्रमुख आणि आहरण व संवितरण अधिकारी यांनी त्यांचे स्तरावर प्रथम खात्री करावी.

१.२ उक्त परि.क्र.१.१ मध्ये नमूद केल्याप्रमाणे समुचित खात्री केल्यानंतर मृत कर्मचाऱ्याच्या कुटुंबास / कायदेशीर वारसास तसेच रुग्णता निवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यास परिभाषित अंशदान निवृत्तिवेतन योजनेतंर्गत यापूर्वी शासनाचे अंशदान व त्यावरील व्याज प्रदान करण्यात आले असल्यास प्रथम सदर रकमेचे समायोजन करणे आवश्यक आहे.

१.३ कार्यालय प्रमुख आणि आहरण व संवितरण अधिकारी यांनी शासनाचे अंशदान व त्यावरील व्याजाचा तपशिल यथास्थिती अधिदान व लेखा कार्यालय किंवा संबंधित जिल्हा कोषागार कार्यालय यांच्यामार्फत उपराज्य अभिलेख देखभाल अभिकरण कार्यालयाकडून प्राप्त करुन घ्यावा.

१.४ कार्यालय प्रमुख आणि आहरण व संवितरण अधिकारी यांनी महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तिवेतन) नियम, १९८२ मधील समुचित तरतुदींस अनुसरुन सादर करावयाच्या मृत कर्मचाऱ्याच्या कुटुंब निवृत्तिवेतन व मृत्यु उपदानाच्या तसेच रुग्णता निवृत्तीवेतन व सेवानिवृत्ती उपदानाच्या प्रस्तावामध्ये शासनाला येणे असलेल्या रकमा तसेच उक्त परिच्छेद १.२ मध्ये नमूद पैकी जी रक्कम समायोजन योग्य आहे, अशा रकमेचा तपशील समुचित लेखाशिर्षांसह अंतर्भूत करुनच कुटुंब निवृत्तिवेतनाचा व मृत्यु उपदानाचा / रुग्णता निवृत्तीवेतन व सेवानिवृत्ती उपदानाचा प्रस्ताव महालेखापाल कार्यालयाकडे मंजूरीसाठी सादर करावा.

१.५ उक्त परि.१.४ मध्ये दर्शविलेल्या समायोजन योग्य रक्कम खालील लेखाशीर्षाखाली समायोजित करणे आवश्यक राहील. तसेच अन्य शासकीय येणे रकमांचे समायोजन समुचित लेखाशीर्षाखाली करणे आवश्यक राहील.

| | मराठी | इंग्रजी |
|---|---|---|
| | **१) शासनाचे अंशदान** | |
| मुख्यलेखाशीर्ष | ००७१ – निवृत्तीवेतन व इतर सेवानिवृत्ती लाभ यांच्या संबंधातील अंशदानाच्या व वसुलीच्या रकमा | 0071, Contribution and Recoveries towards Penson and other Retirement Benefits |
| उपमुख्यलेखाशीर्ष | ०१ नागरी | 01 Civil |
| गौणशीर्ष | १०१ अभिदाने व अंशदाने | 101, Subscriptions and Contributions |
| गटशीर्ष | ०१ अभिदाने व अंशदाने | 01 Subscriptions and Contributions |
| उपगटशीर्ष | (०१) (१५) परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजनेंतर्गत मान्यताप्राप्त अनुदानित दिव्यांगांच्या निवासी / अनिवासी शाळा / कर्मशाळा / मतिमंदांकरीताची बालगृहे यांमधील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसाठी नियोक्त्याच्या अंशदानाच्या समायोजनामुळे होणारी जमा रक्कम (००७१०२६२०१) | (01) (15) Receipts of adjustments of employer’s contribution for Teaching and Non-teaching Employees under Defined contribution pension scheme for approved and aided residential / non-residential special schools / workshops for persons with disabilities / children home for mentally deficient persons. (0071026201) |
| | **२) शासनाचे अंशदानावरील व्याज** | |
| मुख्यलेखाशीर्ष | ००४९ व्याजाच्या जमा रकमा | 0049, Interest Receipts |
| उपमुख्यलेखाशीर्ष | ०४ राज्य / संघराज्य क्षेत्र विधानमंडळ असलेल्या शासनाच्या व्याजाच्या जमा रकमा | 04, Interest Receipts of State / Union Territory Governments with Legislature |
| गौणशीर्ष | ८०० इतर जमा रकमा | 800, Other Receipts |
| गटशीर्ष | ०१ इतर जमा रकमा | 01, Other Receipts |
| उपगटशीर्ष | (०१) (५५) परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजनेंतर्गत मान्यताप्राप्त व अनुदानित दिव्यांगांच्या निवासी / अनिवासी शाळा / कर्मशाळा / मतिमंदां करीताची बालगृहे यांमधील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसाठी शासनाच्या अंशदानावरील व्याज (००४९५२५२०१) | (01)(55) Interest on Government contribution for teaching and non-teaching Employees under Defined contribution pension scheme for approved and aided residential / non-residential special schools / workshops for persons with disabilities / children home for mentally deficient persons. (0049525201) |

१.६ महालेखापाल कार्यालयाकडून मृत्यु उपदान व कुटुंब निवृत्तिवेतन / सेवानिवृत्ती उपदान व रुग्णता निवृत्तीवेतन प्रदान आदेश प्राप्त झाल्यानंतर कार्यालय प्रमुख आणि आहरण व संवितरण अधिकाऱ्यांनी मृत्यु / सेवानिवृत्ती उपदानाच्या रकमेतून शासनाला येणे असलेल्या सर्व रकमा (शासनाचे अंशदान व त्यावरील व्याज तसेच इतर शासकीय येणे.) समुचित लेखाशिर्षाखाली समायोजन प्रस्तावित करुन देयक अधिदान व लेखा कार्यालयात किंवा जिल्हा कोषागार कार्यालयात सादर करावे.

१.७ मृत्यु उपदानाच्या रकमेतून प्रथमतः इतर शासकीय येणे रक्कम वसूल करण्यात यावी व त्यानंतर शिल्लक मृत्यु उपदानाच्या रकमेतून शासनाचे अंशदान व त्यावरील व्याज याची जेवढी रक्कम समायोजित करणे शक्य आहे, तेवढी रक्कम समायोजित करुन, उर्वरित शासनाचे अंशदान व त्यावरील व्याजाची रक्कम कुटुंब निवृत्तिवेतनाच्या थकबाकीच्या प्रथम प्रदानामधून समायोजित करणेबाबत विहित कार्यपध्दती अनुसरुन कार्यालय प्रमुख आणि आहरण व संवितरण अधिकारी यांनी यथास्थिती अधिदान व लेखा कार्यालय / जिल्हा कोषागार कार्यालय यांना कळवावे.

तसेच रुग्णता निवृत्तिवेतनासंदर्भात उक्त परि.१.६ मध्ये दर्शविण्यात आलेल्या समायोजनेच्या रकमा सेवानिवृत्ती उपदानाच्या रकमेपेक्षा अधिक असल्यास जेवढी रक्कम सेवानिवृत्ती उपदानामधून समायोजित करणे शक्य आहे, तेवढी रक्कम समायोजित करुन उर्वरित रक्कम रुग्णता निवृत्तिवेतनाच्या थकबाकीच्या प्रथम प्रदानामधून समायोजित करणेबाबत विहित कार्यपध्दती अनुसरुन कार्यालय प्रमुख आणि आहरण व संवितरण अधिकारी यांनी यथास्थिती अधिदान व लेखा कार्यालय / जिल्हा कोषागार कार्यालय यांना कळवावे.

अधिदान व लेखा कार्यालय / जिल्हा कोषागार कार्यालय यांनी कार्यालय प्रमुखाने प्रस्तावित केलेली समायोजनाची रक्कम कुटुंब / रुग्णता निवृत्तिवेतनाच्या थकबाकीच्या प्रथम प्रदानाच्या रकमेतून समायोजित करुनच कुटुंब / रुग्णता निवृत्तिवेतनधारकास नियमित मासिक कुटुंब / रुग्णता निवृत्तिवेतनाचे संवितरण सुरु करावे.

कार्यालय प्रमुखाने प्रस्तावित केलेली समायोजनाची (शासनाचे अंशदान व त्यावरील व्याज) रक्कम जर कुटुंब / रुग्णता निवृत्तिवेतनाच्या थकबाकीच्या प्रथम प्रदानाच्या रकमेपेक्षा जास्त असेल, तर कुटुंब / रुग्णता निवृत्तिवेतनाची थकबाकीची प्रथम प्रदानाची संपूर्ण रक्कम समायोजित करून, शिल्लक रक्कम पुढील कुटुंब / रुग्णता निवृत्तिवेतनाच्या प्रदानातून टप्प्या-टप्प्याने वसूल करण्यात यावी. त्यासाठी वित्त विभाग, शासन परिपत्रक क्रमांक संकीर्ण- १०९९ / प्र. क्र. ९९ / कोषा-४, दिनांक १२ ऑगस्ट, १९९९ अन्वये विहित करण्यात आलेली कार्यपध्दती अनुसरण्यात यावी.

शासनाचे अंशदान व त्यावरील व्याज यांची संपूर्ण रक्कम पूर्णपणे समायोजित करण्याची जबाबदारी पूर्णतः संबंधित कार्यालय प्रमुख आणि आहरण व संवितरण अधिकारी यांची राहील.

**२. परिभाषित अंशदान निवृत्तिवेतन योजनेअंतर्गत अंशदान व त्यावरील व्याजाच्या रकमेचा परतावा न केलेल्या प्रकरणी अनुसरावयाची कार्यपध्दती :-**

२.१ मृत कर्मचाऱ्याच्या कुटुंबास / कायदेशीर वारसास / रुग्णता निवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यास अद्यापपर्यंत परिभाषित अंशदान निवृत्तिवेतन योजनेंतर्गत अंशदान व त्यावरील व्याजाचा परतावा दिला नसल्यास व सद्यः स्थितीत मृत कर्मचाऱ्याच्या कुटुंबाने / रुग्णता निवृत्त झालेल्या कर्मचाऱ्याने या शासन निर्णयासोबतच्या नमुना-३ अनुसार महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तिवेतन) नियम, १९८२ प्रमाणे कुटुंब /रुग्णता निवृत्तिवेतनाचा लाभ देण्याबाबतच्या विकल्पाची निवड केली असल्यास, प्रथम वस्तुनिष्ठ खात्री करून संबंधित मृत कर्मचाऱ्याच्या कुटुंबास / कायदेशीर वारसास किंवा रुग्णता निवृत्त झालेल्या संबंधित कर्मचाऱ्यास परिभाषित अंशदान निवृत्तिवेतन योजनेंतगर्त त्याच्या खात्यामधील एकूण जमा अंशदान व त्यावरील व्याजाच्या रकमेपैकी फक्त कर्मचाऱ्याचे स्वतःचे अंशदान व त्यावरील व्याजाची रक्कम देय ठरेल.

यासाठी कार्यालय प्रमुख आणि आहरण व संवितरण अधिकारी यांनी वाचा-१० येथील दिनांक २६ एप्रिल, २०२४ मधील तरतुदीनुसार अधिदान व लेखा कार्यालय / जिल्हा कोषागार कार्यालयाकडे परिपूर्ण प्रस्ताव सादर करावा.

२.२ अधिदान व लेखा कार्यालय / जिल्हा कोषागार कार्यालय यांनी उक्त परिच्छेद २.१ मधील तरतूदीस अनुसरुन सरुन त्यांचेकडे सादर झालेल्या प्रस्तावाची तपासणी करुन परिभाषित अंशदान निवृत्तिवेतन योजनेंतर्गत जमा झालेल्या रकमांचे विवरणपत्र (दिव्यांग कल्याण विभाग, शासन निर्णय दिनांक २६ एप्रिल, २०२४ सोबतचा नमुना-ड) निर्गमित करावे.

२.३ अधिदान व लेखा कार्यालय/जिल्हा कोषागार कार्यालयाकडून प्राप्त झालेल्या उपरोल्लेखित विवरणपत्र नमुना-ड च्या आधारे कार्यालय प्रमुख आणि आहरण व संवितरण अधिकारी यांनी मृत कर्मचाऱ्याच्या कुटुंबास / कायदेशीर वारसास किंवा संबंधित रुग्णता निवृत्त कर्मचाऱ्याच्या जमा अंशदान व त्यावरील व्याजाच्या रकमेचा परतावा प्रस्ताव कर्मचाऱ्याने दिलेल्या विकल्पाच्या सत्यप्रतीसह (या शासन निर्णयासोबतचा नमुना-३) उपराज्य अभिलेख देखभाल अभिकरण कार्यालयाकडे सादर करावा.

२.४ उपराज्य अभिलेख देखभाल अभिकरण कार्यालयास प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर केवळ कर्मचाऱ्यांचे अंशदान व त्यावरील जमा व्याज अशा एकूण रकमेचा परतावा आदेश उपराज्य अभिलेख देखभाल अभिकरण कार्यालयाने नमुना इ (दिव्यांग कल्याण विभाग, शासन निर्णय दिनांक २६ एप्रिल, २०२४ सोबतचा नमुना-इ) निर्गमित करावा.

२.५ आहरण व संवितरण अधिकारी यांनी नमुना इ च्या आधारे अधिदान व लेखा कार्यालय/जिल्हा कोषागार कार्यालयात नमुना ४५-अ मध्ये देयक सादर करावे. कर्मचाऱ्याचे स्वतःचे अंशदान व त्यावरील व्याज मृत कर्मचाऱ्याच्या कुटुंबास / वारसास / रुग्णता निवृत्तिवेतनधारकास प्रदान करावे.

२.६ उपराज्य अभिलेख देखभाल अभिकरण कार्यालयाने संपूर्ण आर्थिक वर्षातील सर्व परतावा प्रकरणांतील (नमुना इ प्रकरणे) शासनाचे अंशदान, मुख्यलेखाशीर्ष ८३४२ ५५६२ तसेच त्यावरील जमा व्याजाची संपूर्ण रक्कम मुख्य लेखाशीर्ष २०४९ २८७२ खाली खर्ची टाकून शासन निर्णयातील

परिशिष्ट-१ मधील परिच्छेद-अ)१.५ खालील तक्त्यामध्ये दर्शविलेल्या लेखाशीर्षखाली जमा दर्शविण्याकरीता निरंक देयक (Nil Bill) आर्थिक वर्षाअखेर सादर करावे.

२.७ कार्यालय प्रमुख आणि आहरण व संवितरण अधिकारी यांनी महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तिवेतन) नियम, १९८२ मधील समुचित तरतुदीस अनुसरुन सादर करावयाच्या मृत कुटुंबियाच्या वारसास कुटुंब निवृत्तीवेतन व मृत्यु उपदान तसेच रुग्णता निवृत्त कर्मचाऱ्याच्या रुग्णता निवृत्तिवेतन व सेवानिवृत्ती उपदानाच्या प्रस्तावामध्ये शासनाला येणे असलेल्या अन्य रकमा समुचित लेखाशीर्ष नमूद करुनच रुग्णता निवृत्तिवेतन व सेवानिवृत्ती उपदानाचा प्रस्ताव महालेखापाल कार्यालयाकडे मंजूरीसाठी सादर करावा.

२.८ महालेखापाल कार्यालयाकडून मृत्यु उपदान व कुटुंब निवृत्तीवेतन / सेवानिवृत्ती उपदान व रुग्णता निवृत्तिवेतन प्रदान आदेश प्राप्त झाल्यानंतर कार्यालय प्रमुख आणि आहरण व संवितरण अधिकाऱ्यांनी मृत्यु उपदान / सेवानिवृत्ती उपदानाच्या रकमेतून शासनाला येणे असलेल्या रकमा समुचित लेखाशिर्षाखाली समायोजन प्रस्तावित करुन देयक अधिदान व लेखा कार्यालयात किंवा जिल्हा कोषागार कार्यालयात सादर करावे.

२.९ उक्त परि.२.८ मध्ये दर्शविण्यात आलेल्या समायोजनाच्या रकमा मृत्यु उपदान / सेवानिवृत्ती उपदानाच्या रकमेपेक्षा अधिक असल्यास जेवढी रक्कम मृत्यु उपदान / सेवानिवृत्ती उपदानामधून समायोजित करणे शक्य आहे, तेवढी रक्कम समायोजित करुन उर्वरित रक्कम कुटुंब निवृत्तीवेतन / रुग्णता निवृत्तिवेतनाच्या थकबाकीच्या प्रथम प्रदानामधून समायोजित करणेबाबत विहित कार्यपध्दती अनुसरुन कार्यालय प्रमुख आणि आहरण व संवितरण अधिकारी यांनी यथास्थिती अधिदान व लेखा कार्यालय / जिल्हा कोषागार कार्यालय यांना कळवावे.

अधिदान व लेखा कार्यालय/जिल्हा कोषागार कार्यालय यांनी कार्यालय प्रमुखाने प्रस्तावित केलेली रक्कम कुटुंब निवृत्तीवेतन / रुग्णता निवृत्तिवेतनाच्या थकबाकीच्या प्रथम प्रदानाच्या रकमेतून समायोजित करुनच कुटुंब / रुग्णता निवृत्तिवेतनधारकास नियमित कुटुंब /रुग्णता निवृत्तिवेतनाचे संवितरण सुरु करावे.

कार्यालय प्रमुखाने प्रस्तावित केलेली समायोजनाची रक्कम जर कुटुंब / रुग्णता निवृत्तिवेतनाच्या थकबाकीच्या रकमेपेक्षा जास्त असेल, तर कुटुंब / रुग्णता निवृत्तिवेतनाची थकबाकीची संपूर्ण रक्कम समायोजित करून शिल्लक रक्कम पुढील कुटुंब / रुग्णता निवृत्तिवेतनाच्या प्रदानातून टप्प्या-टप्प्याने वसूल करण्यात यावी. त्यासाठी वित्त विभाग, शासन परिपत्रक क्रमांक संकीर्ण- १०९९/प्र.क्र.९९/कोषा-४, दिनांक १२ ऑगस्ट, १९९९ अन्वये विहित करण्यात आलेली कार्यपध्दती अनुसरण्यात यावी.

शासनाची येणे असलेली संपूर्ण रक्कम पूर्णपणे समायोजित करण्याची जबाबदारी संबंधित कार्यालय प्रमुख आणि आहरण व संवितरण अधिकारी यांची राहील.

ब) **राष्ट्रीय निवृत्तिवेतन प्रणाली लागू असलेले कर्मचारी :**

**१) राष्ट्रीय निवृत्तिवेतन प्रणाली अंतर्गत PRAN खात्यामध्ये जमा संचित रकमेचे प्रदान करण्यात आलेल्या प्रकरणी अनुसरावयाची कार्यपध्दतीः**

१.१ मृत कर्मचाऱ्याच्या कुटुंबास / कायदेशीर वारसास / रुग्णता निवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यास Pension Fund Regulatory and Development Authority (Exits and Withdrawals Under the National Pension System) Regulations 2015 आणि त्यामध्ये वेळोवेळी करण्यात आलेल्या सुधारणांन्वये कर्मचाऱ्याच्या PRAN खात्यामध्ये जमा संचित रकमेचे प्रदान Exit Withdrawal Process द्वारे करण्यात आले असल्यास, याबाबत कार्यालय प्रमुख आणि आहरण व संवितरण अधिकारी यांनी त्यांचे स्तरावर प्रथम खात्री करावी.

१.२ ज्या प्रकरणी PRAN खात्यामधील संचित रकमेमधून वार्षिकी योजना (Annuity Plan) खरेदी करण्याची कार्यवाही मृत कर्मचाऱ्याच्या कुटुंबियाकडून / कायदेशीर वारसांकडून किंवा रुग्णता निवृत्त कर्मचाऱ्यांकडून यापूर्वीच पूर्ण करण्यात आलेली असेल आणि संबंधितांना वार्षिकीचे (Annuity) नियमित प्रदान देखील सुरू झालेले असेल, अशा प्रकरणी निवृत्तिवेतन निधी विनियामक व विकास प्राधिकरण (PFRDA) यांचे परिपत्रक क्रमांक PFRDA/२०२१/३०/SUP/ASP/६, दिनांक २२ जुलै, २०२१ अन्वये वार्षिकी समर्पित (surrender) करण्यासंदर्भात निर्गमित करण्यात आलेल्या मार्गदर्शक सूचनांस अनुसरून विचारपूर्वक यथोचित निर्णय घेण्याची मुभा संबंधित मृत कर्मचाऱ्याच्या कुटुंबियांना/ कायदेशीर वारसांना तसेच रुग्णता निवृत्त कर्मचाऱ्यांना असेल. वार्षिकी समर्पण (surrender) करणे किंवा न करणेबाबत मृत कर्मचाऱ्याच्या कुटुंबियांनी / कायदेशीर वारसांनी तसेच रुग्णता निवृत्त कर्मचाऱ्यांनी कोणताही निर्णय घेतला तरी, मृत्युसमयी मृत कर्मचाऱ्याच्या / रुग्णता निवृत्त कर्मचाऱ्याच्या PRAN खात्यामध्ये जी एकुण संचित रक्कम जमा होती त्या एकूण संचित जमा रकमेतील केवळ शासनाचे अंशदान व त्यावरील जमा लाभाच्या रकमेचे समायोजन कार्यालय प्रमुख आणि आहरण व संवितरण अधिकारी यांनी करणे अनिवार्य राहील.

१.३ उक्त परि.क्र.१.१ नुसार समुचित खात्री केल्यानंतर आणि परिच्छेद क्र. १.२ मधील वस्तुस्थिती विचारात घेतल्यानंतर मृत कर्मचाऱ्याच्या कुटुंबास / कायदेशीर वारसास तसेच तसेच रुग्णता निवृत्त कर्मचाऱ्यास राष्ट्रीय निवृत्तिवेतन प्रणाली अंतर्गत यापूर्वी प्रदान करण्यात आलेल्या मृत्युसमयी / रुग्णता सेवानिवृत्तीसमयी कर्मचाऱ्याच्या PRAN खात्यामध्ये जमा एकूण संचित रकमेतील शासनाचे अंशदान व त्यावरील जमा लाभाची रकमेचे प्रथम समायोजन करणे आवश्यक आहे.

१.४ मृत्युसमयी कर्मचाऱ्याच्या PRAN खात्यामध्ये जमा एकूण संचित रकमेतील केवळ शासनाचे अंशदान व त्यावरील जमा लाभाची रक्कम याबाबतचा तपशिल संबंधित कार्यालय प्रमुख आणि आहरण व संवितरण अधिकारी यांनी अधिदान व लेखा कार्यालय / जिल्हा कोषागार कार्यालयामार्फत केंद्रीय अभिलेख देखभाल अभिकरणाकडून (CRA-Protean) प्राप्त करुन घ्यावा. तसेच रुग्णता सेवानिवृत्त कर्मचाऱ्याच्या बाबतीत PRAN खात्यातील संचित रकमेतील कर्मचाऱ्याचे अंशदान व त्यावरील जमा लाभाची रक्कम आणि शासनाचे अंशदान व त्यावरील जमा लाभाची रक्कम याची

स्वतंत्र परिगणना केंद्रीय अभिलेख देखभाल अभिकरण (CRA-Protean) यांचेकडून करुन घेण्यात यावी.

१.५ कार्यालय प्रमुख आणि आहरण व संवितरण अधिकारी यांनी महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तिवेतन) नियम, १९८२ मधील समुचित तरतुदीस अनुसरुन सादर करावयाच्या मृत कर्मचाऱ्याच्या कुटुंब निवृत्तिवेतनाच्या तसेच रुग्णता निवृत्त कर्मचाऱ्याच्या रुग्णता निवृत्तीवेतन व सेवानिवृत्ती उपदानाच्या प्रस्तावामध्ये शासनाला येणे असलेल्या अन्य रकमा तसेच उक्त परिच्छेद १.३ मध्ये नमूद पैकी जी रक्कम समायोजन योग्य आहे, अशा रकमेचा तपशील समुचित लेखाशिर्षासह अंतर्भूत करुनच कुटुंब निवृत्तिवेतन व मृत्यु उपदानाचा प्रस्ताव महालेखापाल कार्यालयाकडे मंजूरीसाठी सादर करावा.

१.६ उक्त परि.१.३ मध्ये दर्शविलेल्या समायोजन योग्य रक्कम शासन निर्णयातील परिशिष्ट-१ मधील परिच्छेद अ)१.५ खाली दर्शविलेल्या लेखाशीर्षाखाली समायोजित करणे आवश्यक राहील. तसेच अन्य शासकीय येणे रकमांचे समायोजन समुचित लेखाशीर्षांखाली करणे आवश्यक राहील.

१.७ महालेखापाल कार्यालयाकडून मृत्यु उपदान व कुटुंब निवृत्तिवेतन / सेवानिवृत्ती उपदान व रुग्णता निवृत्तीवेतन प्रदान आदेश प्राप्त झाल्यानंतर कार्यालय प्रमुख आणि आहरण व संवितरण अधिकाऱ्यांनी मृत्यु उपदानाच्या / सेवानिवृत्ती उपदानाच्या रकमेतून शासनाला येणे असलेल्या सर्व रकमा (शासनाचे अंशदान व त्यावरील लाभ तसेच इतर शासकीय येणे) समुचित लेखाशिर्षाखाली समायोजन प्रस्तावित करुन देयक अधिदान व लेखा कार्यालयात किंवा जिल्हा कोषागार कार्यालयात सादर करावे.

१.८ उक्त परि. १.६ मध्ये दर्शविण्यात आलेल्या समायोजनाच्या रकमा मृत्यु उपदानाच्या / सेवानिवृत्ती उपदानाच्या रकमेपेक्षा अधिक असल्यास जेवढी रक्कम उपदानाच्या / सेवानिवृत्ती उपदानाच्या रकमेतून समायोजित करणे शक्य आहे, तेवढी इतर शासकीय येणे रक्कम प्रथमतः वसूल करण्यात यावी. त्यानंतर शिल्लक मृत्यु उपदानाच्या / सेवानिवृत्ती उपदानाच्या रकमेतून शासनाचे अंशदान व त्यावरील व्याजाची रक्कम कुटुंब निवृत्तिवेतनाच्या / रुग्णता निवृत्तीवेतनाच्या थकबाकीच्या प्रथम प्रदानामधून समायोजित करणेबाबत विहित कार्यपध्दती अनुसरुन कार्यालय प्रमुख आणि आहरण व संवितरण अधिकारी यांनी यथास्थिती अधिदान व लेखा कार्यालय / जिल्हा कोषागार कार्यालय यांना कळवावे.

अधिदान व लेखा कार्यालय / जिल्हा कोषागार कार्यालय यांनी कार्यालय प्रमुखाने प्रस्तावित केलेली समायोजनाची रक्कम कुटुंब निवृत्तिवेतनाच्या / रुग्णता निवृत्तीवेतनाच्या थकबाकीच्या प्रथम प्रदानाच्या रकमेतून समायोजित करुनच कुटुंब / रुग्णता निवृत्तिवेतनधारकास नियमित मासिक कुटुंब / रुग्णता निवृत्तिवेतनाचे संवितरण सुरु करावे.

कार्यालय प्रमुखाने प्रस्तावित केलेली समायोजनाची (शासनाचे अंशदान व त्यावरील व्याज) रक्कम जर कुटुंब / रुग्णता निवृत्तिवेतनाच्या थकबाकीच्या प्रथम प्रदानाच्या रकमेपेक्षा जास्त असेल, तर कुटुंब / रुग्णता निवृत्तिवेतनाची थकबाकीची प्रथम प्रदानाची संपूर्ण रक्कम समायोजित करून, शिल्लक रक्कम पुढील कुटुंब निवृत्तिवेतनाच्या प्रदानातून टप्प्या-टप्प्याने वसूल करण्यात यावी.

त्यासाठी वित्त विभाग, शासन परिपत्रक क्रमांक : संकीर्ण- १०९९ / प्र. क्र. ९९ / कोषा-४, दिनांक १२ ऑगस्ट, १९९९ अन्वये विहित करण्यात आलेली कार्यपध्दती अनुसरण्यात यावी.

शासनाचे अंशदान व त्यावरील लाभ यांची संपूर्ण रक्कम पूर्णपणे समायोजित करण्याची जबाबदारी पूर्णतः संबंधित कार्यालय प्रमुख आणि आहरण व संवितरण अधिकारी यांची राहील.

**२) राष्ट्रीय निवृत्तिवेतन प्रणाली अंतर्गत PRAN खात्यामध्ये जमा संचित रकमेचे प्रदान न करण्यात आलेल्या प्रकरणी अनुसरावयाची कार्यपध्दतीः**

२.१ मृत कर्मचाऱ्याच्या कुटुंबास / कायदेशीर वारसास / रुग्णता निवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यास राष्ट्रीय निवृत्तीवेतन प्रणाली अंतर्गत Exits and Withdrawal Process द्वारे जमा संचित रकमेचे प्रदान करण्यात आले नसल्यास, व सद्यस्थितीत मृत कर्मचाऱ्याच्या कुटुंबाने / रुग्णता निवृत्त झालेल्या कर्मचाऱ्याने नमुना-३ अनुसार महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम, १९८२ प्रमाणे कुटुंब / रुग्णता निवृत्तीवेतनाचा लाभ देण्याबाबतच्या विकल्पाची निवड केली असल्यास, अशा प्रकरणी संबंधित मृत कर्मचाऱ्याच्या कुटुंबास / कायदेशीर वारसास किंवा रुग्णता निवृत्त कर्मचाऱ्यास संबंधित कर्मचाऱ्याच्या **PRAN** खात्यामध्ये मृत्युसमयी / रुग्णता निवृत्ती समयी जमा असलेले एकूण संचित जमा रकमेपैकी कर्मचाऱ्याचे स्वत:चे अंशदान व त्यावरील जमा लाभाची रक्कम देय ठरेल.

यासाठी कार्यालय प्रमुख / आहरण व संवितरण अधिकारी यांनी संबंधित कर्मचाऱ्याच्या **PRAN** खात्यामध्ये मृत्युसमयी / रुग्णता सेवानिवृत्तीसमयी जमा असलेले संचित रकमेचे वित्त विभाग, शासन परिपत्रक, क्रमांक : अंनियो-२०१७ / प्र. क्र. २६ / सेवा-४, दिनांक २८ जुलै, २०१७ व वित्त विभाग, शासन शुद्धीपत्रक क्रमांक : अंनियो-२०१७ / प्र. क्र. २६ / सेवा-४, दिनांक १८ नोव्हेंबर, २०२१ मधील तरतूदीनुसार Error Rectification Module द्वारे रक्कम परत मागविण्यासाठी अधिदान व लेखा कार्यालय / जिल्हा कोषागार कार्यालयाकडे परिपूर्ण प्रस्ताव सादर करावा.

२.२ आहरण व संवितरण अधिकारी यांचेकडून प्राप्त झालेल्या प्रस्तावाच्या आधारे अधिदान व लेखा कार्यालय / जिल्हा कोषागार कार्यालय यांनी केंद्रीय अभिलेख देखभाल अभिकरण (CRN-Protean) प्रणालीवर Error Rectification Module द्वारे मृत / रुग्णता निवृत्त कर्मचाऱ्याच्या **PRAN** खात्यामध्ये जमा असलेली एकूण संचित रक्कम परत मागवावी. मृत / रुग्णता निवृत्त कर्मचाऱ्याच्या **PRAN** खात्यातील संचित रकमेतील कर्मचाऱ्याचे अंशदान व त्यावरील जमा लाभाची रक्कम आणि शासनाचे अंशदान व त्यावरील जमा लाभाची रक्कम याची स्वतंत्र परिगणना केंद्रीय अभिलेख देखभाल अभिकरण (CRN-Protean) यांचेकडून करून घेण्यात यावी.

२.३ अधिदान व लेखा कार्यालय / जिल्हा कोषागार कार्यालयांनी शासनाचे अंशदान व त्यावरील व्याज परिशिष्ट-१ मधील परिच्छेद अ) १.५ मध्ये नमूद लेखाशीर्षाखाली शासन खाती तात्काळ जमा करावे. कर्मचाऱ्याचे अंशदान व त्यावरील जमा लाभाची रक्कम संबंधित आहरण व संवितरण अधिकारी यांचे खात्यावर वर्ग करण्यात यावी. आहरण व संवितरण अधिकारी यांनी सदर रकमेचे मृत कर्मचाऱ्याच्या कुटुंबास / वारसास / रुग्णता निवृत्तीवेतन धारकास प्रदान करावे.

२.४ कार्यालय प्रमुख आणि आहरण व संवितरण अधिकारी यांनी महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम, १९८२ मधील समुचित तरतूदीस अनुसरुन सादर करावयाच्या मृत कर्मचाऱ्याच्या कुटुंब

निवृत्तीवेतनाच्या आणि मृत्यु उपदानाच्या तसेच रुग्णता निवृत्तीवेतन व सेवानिवृत्ती उपदानाच्या प्रस्तावामध्ये शासकीय येणे रकमांचे समायोजन समुचित लेखाशीर्षांसह अंतर्भुत करूनच कुटुंब निवृत्तीवेतनाचा आणि मृत्यु उपदानाचा प्रस्ताव महालेखापाल कार्यालयाकडे मंजूरीसाठी सादर करावा.

२.५ महालेखापाल कार्यालयाकडून मृत्यु उपदान व कुटुंब निवृत्तीवेतन / सेवानिवृत्ती उपदान व रुग्णता निवृत्तीवेतन प्रदान आदेश प्राप्त झाल्यानंतर कार्यालय प्रमुख आणि आहरण व संवितरण अधिकाऱ्यांनी मृत्यु / सेवानिवृत्ती उपदानाच्या रकमेतून शासनाला येणे असलेल्या सर्व रकमा समुचित लेखाशीर्षाखाली समायोजन प्रस्तावित करून देयक अधिदान व लेखा कार्यालयात किंवा जिल्हा कोषागार कार्यालयात सादर करावे.

२.६ उक्त परिच्छेदांमध्ये दर्शविण्यात आलेल्या समायोजनाच्या रकमा मृत्यु / सेवानिवृत्ती उपदानाच्या रकमेपेक्षा अधिक असल्यास जेवढी रक्कम मृत्यु / सेवानिवृत्ती उपदानामधून समायोजित करणे शक्य आहे, तेवढी रक्कम समायोजित करून उर्वरित रक्कम रुग्णता निवृत्तीवेतनाच्या थकबाकीच्या प्रथम प्रदानामधून समायोजित करणेबाबत विहित कार्यपद्धती अनुसरुन कार्यालय प्रमुख आणि आहरण व संवितरण अधिकारी यांनी यथास्थिती अधिदान व लेखा कार्यालय / जिल्हा कोषागार कार्यालय यांना कळवावे.

अधिदान व लेखा कार्यालय / जिल्हा कोषागार कार्यालय यांनी कार्यालय प्रमुखाने प्रस्तावित केलेली समायोजनाची रक्कम कुटुंब / रुग्णता निवृत्तीवेतनाच्या थकबाकीच्या प्रथम प्रदानाच्या रकमेतून समायोजित करूनच कुटुंब निवृत्तीवेतन धारकास नियमित मासिक कुटुंब निवृत्तीवेतनाचे संवितरण सुरु करावे.

रुग्णता निवृत्तीवेतन धारकाच्या बाबतीत जर कार्यालय प्रमुखाने प्रस्तावित केलेली समायोजनाची रक्कम रुग्णता निवृत्तीवेतनाच्या थकबाकीच्या रकमेपेक्षा अधिक असेल, तर रुग्णता निवृत्तीवेतनाची थकबाकीची संपूर्ण रक्कम समायोजित करून शिल्लक रक्कम पुढील रुग्णता निवृत्तीवेतनाच्या प्रदानातून टप्प्याटप्प्याने वसूल करण्यात यावी. त्यासाठी वित्त विभाग, शासन परिपत्रक, क्रमांक : संकीर्ण-१०९९ / प्र. क्र. ९९ / कोषा-४, दिनांक १२ ऑगस्ट, १९९९ अन्वये विहित करण्यात आलेली कार्यपद्धती अनुसरण्यात यावी.

शासनास येणे रकमा समायोजित करण्याची संपूर्ण जबाबदारी ही कार्यालय प्रमुख तसेच आहरण व संवितरण अधिकारी यांची राहील.

********************

**दिव्यांग कल्याण विभाग, शासन निर्णय क्रमांक : इडीडी -२०२३ / प्र. क्र. १६९ / दि.क.-१, दिनांक १२ डिसेंबर, २०२४ सोबतचे परिशिष्ट.**

## परिशिष्ट - २

परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना / राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना अंतर्गत या शासन निर्णयाच्या दिनांकानंतर सेवेत असताना रुग्णता निवृत्त झालेला कर्मचारी किंवा मृत झालेला कर्मचाऱ्याचे कुटुंबिय, महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम, १९८२ प्रमाणे रुग्णता निवृत्तीवेतन / कुटुंब निवृत्तीवेतन मिळण्यास पात्र ठरत असल्यास व सदर कर्मचाऱ्याने / मृत कर्मचाऱ्याच्या कुटुंबाने महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम, १९८२ प्रमाणे लाभ देण्याबाबतच्या विकल्पाची नमुना-२ अनुसार निवड केली असल्यास, त्यानुषंगाने रुग्णता निवृत्तीवेतन आणि सेवानिवृत्ती उपदान किंवा कुटुंब निवृत्तीवेतन व मृत्यु उपदान अनुज्ञेय करण्याबाबतची कार्यपध्दती.

१. परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना लागू असलेला शासकीय कर्मचारी या शासन निर्णयाच्या दिनांकानंतर रुग्णता सेवानिवृत्त झाल्यास अथवा मृत्यु पावल्यास, कार्यालय प्रमुख / आहरण व संवितरण अधिकारी यांनी वित्त विभाग, शासन परिपत्रक क्रमांकः अनियो-२०१७ / प्र. क्र. २६ / सेवा-४, दिनांक २८ जुलै, २०१७ व वित्त विभाग, शासन शुध्दीपत्रक क्रमांकः अनियो-२०१७ / प्र. क्र. २६ / सेवा-४, दिनांक १८ नोव्हेंबर, २०२१ अन्वये Error Rectification Module द्वारे कर्मचाऱ्याच्या PRAN खाती जमा असलेले कर्मचाऱ्याचे अंशदान व त्यावरील लाभ परत करण्याकरिता अधिदान व लेखा कार्यालय / जिल्हा कोषागार कार्यालयाकडे परिपूर्ण प्रस्ताव सादर करावा.

२. अधिदान व लेखा कार्यालय / जिल्हा कोषागार कार्यालय यांनी आहरण व संवितरण अधिकारी यांचेकडून प्राप्त झालेल्या प्रस्तावाच्या आधारे केंद्रीय अभिलेख देखभाल अभिकरण (CRA- Protean) प्रणालीवर Error Rectification Module द्वारे रुग्णता सेवानिवृत्त कर्मचारी / मृत कर्मचाऱ्याच्या PRAN खात्यामध्ये जमा असलेली अंशदानाची रक्कम परत मागवावी. रुग्णता सेवानिवृत्त कर्मचारी / मृत कर्मचाऱ्याच्या PRAN खात्यातील संचित रकमेपैकी कर्मचाऱ्याचे अंशदान व त्यावरील लाभ आणि शासनाचे अंशदान व त्यावरील लाभ याची स्वतंत्र परिगणना केंद्रीय अभिलेख देखभाल अभिकरण (CRA- Protean) यांचेकडून करुन घेण्यात यावी.

३. अधिदान व लेखा कार्यालय / जिल्हा कोषागार कार्यालयांनी शासनाचे अंशदान व त्यावरील व्याज परिशिष्ट-१ मधील परिच्छेद अ) १ खालील मुद्दा क्र. १.५ खालील लेखाशीर्षाखाली शासन खाती जमा करावे. कर्मचाऱ्याचे अंशदान व त्यावरील लाभाची रक्कम संबंधित आहरण व संवितरण अधिकारी यांचे खात्यावर वर्ग करण्यात यावी. आहरण व संवितरण अधिकारी यांनी कर्मचाऱ्याचे अंशदान व त्यावरील लाभाची रक्कम रुग्णता सेवानिवृत्त कर्मचारी / मृत कर्मचाऱ्याचे कुटुंब किंवा कायदेशीर वारस यांना विनाविलंब प्रदान करावी.

४. महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तिवेतन) नियम, १९८२ मधील तरतुदीनुसार रुग्णता निवृत्तिवेतनाचा व सेवानिवृत्ती उपदान तसेच कुटुंब निवृत्तिवेतन व मृत्यु उपदानाचा प्रस्ताव महालेखापाल कार्यालयास पाठविण्यात यावा.

***************

दिव्यांग कल्याण विभाग, शासन निर्णय क्रमांक : इडीडी -२०२३ / प्र. क्र. १६९ / दि.क.-१, दिनांक ११ डिसेंबर, २०२४ सोबतचे जोडपत्र.

**FORM-1**

**Form for Assessing Gratuity**

**[To be sent four months before the date of retirement to the PAO]**

**PART-I (To be filled by Head of Office)**

| | | |
|---|---|---|
| 1. | Name of the retiring Government servant | |
| 2. | Father's name (and also husband's name in the case of female Government servant) | |
| 3. | Mother's name | |
| 4. | Date of Birth | |
| 5. | Permanent residential address showing village, town, district and State | |
| 6. | PAN No. | |
| 7. | Post held at the time of retirement: | |
| | (a) Name of the Office | |
| | (b) Post held | |
| | (c) Level of pay in the pay matrix | |
| | (d) Basic pay | |
| | (e) Whether declared substantive in any post under the State Government | |
| 8. | Date of beginning of service | |
| 9. | Date of ending of service | |
| 10. | Cause of ending of service (please tick one) | |
| | (a) Superannuation | |
| | (b) On being declared surplus | |
| | (c) Voluntary / premature retirement at the initiative of the Government servant | |
| | (d) Premature retirement at the initiative of the Government | |
| | (e) Permanent absorption in public sector undertaking/Autonomous Body | |
| | (f) Invalidment on medical ground | |
| | (g) Due to abolition of post | |
| | (h) Compulsory retirement<br>(i) Removal from service | |

| | | |
|---|---|---|
| 10A | In the case of compulsory retirement, the orders of the competent authority whether gratuity may be allowed at full rates or at reduced rates and in case of reduced rates, the percentage at which it is to be allowed | |
| 10B. | In case of removal from service whether orders of competent authority have been obtained for grant of gratuity and if so, at what rate | |
| 11. | Service in Autonomous body / State Government, if any:- | |
| | (a) Details of Service: | |
| | Name of Organisation | |
| | Post held | |
| | Period of service | From ……..To ………… |
| | (b) Whether the above service is to be counted for gratuity in the Government | |
| | (c) Whether the Autonomous Organisation has discharged its gratuity liability to the State Government | |
| 12. | Whether any department or judicial proceedings are pending against the retiring employee. (If yes, gratuity will be withheld till the conclusion of departmental or judicial proceedings and issue of final orders.) | |
| 13. | Details of Service | |
| | (a) Period of service | From …….. To ……… Total duration of service |
| | (b) Details of omissions, imperfection or deficiencies in the Service Book which have been ignored | |
| | (c) Period not counting as qualifying service | |
| | (i) Extraordinary leave not counting as qualifying service | |
| | (ii) Periods of suspension not treated as qualifying service | |
| | (iii) Interruptions in service | |

| | | |
|---|---|---|
| | (iv) Periods of foreign service with United Nation Bodies for which no contribution for gratuity was received | |
| | (v) Any other period not treated as qualifying service (give details) | |
| | (d) Additions to qualifying service: | |
| | (i) Benefit of service in an Autonomous Body | |
| | (e) Net qualifying service (a-b-c+d) | |
| | (f) Qualifying service expressed in terms of completed six monthly periods (Period of three months and above is to be treated as completed six monthly period) | |
| 14. | Last pay | |
| | Note: If the officer was on foreign service immediately preceding retirement, the notional last pay which he would have drawn under Government but for being on foreign service may he mentioned. | |
| 15. | Amount of retirement gratuity/death gratuity | |
| 16. | Details of gratuity on finalisation of Department/.Judicial proceedings | |
| | (a) Percentage of gratuity to he withheld | |
| | (b) Amount of gratuity after deduction of amount withheld | |
| 17. | Details of Government dues recoverable out of gratuity | |
| | (a) Licence accommodation fee (R) for Government | |
| | (b) Dues | |
| | (c) Amount indicated by Executive Engineer to be withheld | |
| | Post-retirement address of the retiree | |
| | e-mail ID, if any | |
| | Mobile number, if any | |

**CHECKLIST FOR HEAD OF OFFICE FOR TIMELY PROCESSING OF RETIREMENT DUES**

| | | |
|---|---|---|
| 1. | Whether retiring employee is an allottee of Government accommodation. | |
| 2. | The date on which action initiated to obtain the 'No demand certificate from the Executive Engineer | |
| 3. | Date of receipt of 'No Demand Certificate' from Executive Engineer | |
| 4. | Date on which intimation regarding any recovery/ withholding of amount from gratuity received from Executive Engineer | |
| 5. | If retiring employee is not an allottee of Government accommodation, date on which 'No Demand Certificate issued by the office. | |
| 6. | Date on which action initiated to assess the service and emoluments qualifying for gratuity | |
| 7. | Date on which action initiated to assess the Government dues other than the dues relating to allotment of Government accommodation | |
| 8. | Date on which the retiring Government servant was furnished with a certificate regarding the length of qualifying service and the emoluments proposed to be reckoned for retirement gratuity. | |
| 9. | Whether any objection received from the employee on the above certificate | |
| 10. | Whether nominations made for | |
| | Death gratuity/retirement gratuity | |
| 11. | Whether Details of family attached | |
| 12. | Whether the orders of the competent authority regarding grant of gratuity in the cases of compulsory retirement / removal placed on record | |

| | | |
|---|---|---|
| 13. | Whether order for withholding gratuity on finalisation of departmental / judicial proceedings attached, if applicable on finalisation of proceedings. | |
| 14. | Whether statement indicating the reasons for delay (in case the papers for payment of gratuity are not forwarded before four months of the retirement of Government servant) attached | |
| 15. | Whether brief statement leading to reinstatement of the Government servant attached (In case the Government servant has been reinstated after having been suspended, compulsorily retired from service.) | |

## PART-II

### [Account Enfancement (by Accounts Officer)]

| | |
|---|---|
| Date of receipt of papers for payment of gratuity by the Accounts Officer from Head of Officer | |
| **Entitlements admitted-** | |
| A. Length of qualifying service | |
| B. Retirement / Death Gratuity | |
| (i) Total amount of gratuity | |
| (ii) Percentage of gratuity to be withheld | |
| (iii) Amount of gratuity after deduction of amount withheld | |
| (iv) Amount to be adjusted towards arrears of licence fee for Government accommodation and licence fee for retention of Government accommodation beyond retirement | |
| (v) Amount intimated by Executive Engineer for being withheld on account of unassessed licence fee | |

| | |
|---|---|
| (vi) Amount to be adjusted towards Government dues other than those pertaining to Government accommodation | |
| (vii) Net amount to be released immediately | |
| C. Head of account to which the amount of retirement / death gratuity to be debited | |
| D. Whether any order affecting gratuity issued | Yes …… No …… |
| If so, details thereof | |

**Signature of Accounts Officer**

## GRATUITY CALCULATION SHEET

| | | |
|---|---|---|
| 1. | Name | |
| 2. | Designation | |
| 3. | Date of Birth | |
| 4. | Level of pay in the pay matrix | |
| 5. | Basic pay | |
| 6. | Date of entry in the Government service | |
| 7. | Date of retirement | |
| 8. | Length of qualifying service reckoned for gratuity | |
| 9. | Last pay for gratuity | |
| 10. | Retirement gratuity admissible: calculation to be shown as follows: Last pay/4 x Qualifying service (In completed six monthly periods, not exceeding 66) | |

**Signature of the Head of Office**

**Countersigned by PAO**

Copy to Shri/Smt/Kum. ……………………………………………………………………..

Retired / Retiring Govt. servant.

## FORM 2

**Letter to the Accounts Officer forwarding the papers for payment of gratuity of a Government Servant**

**No ……………………..**

**Name and address of Office**

Date :

To

The Accountant General
………………………………..
………………………………..

Subject: Authorisation of gratuity in respect of Shri/Smt./Kum. …………………………

Sir/Madam.

I am directed to forward herewith the papers for payment of gratuity in respect of Shri / Smt./Kum. ……………………………………….of this Department / Office …………………………… for further necessary action.

2 The details of Government dues which will remain outstanding on the date of death / retirement of the Government servant and which need to be recovered/withheld are indicated in item No. 12 of Form 1.

3. The receipt of this letter may be acknowledged.

4. The retirement / death gratuity will be drawn and disbursed by this Ministry / Department/ Office on receipt of authority from you.

Enclosures:
1. Form 1 Completed, along with enclosures and checklists.
2. Service book (date of death / retirement to be indicated in the service book).

Yours faithfully,

(Head of Office)

Notes:
When initials or name of the Government servant are or is incorrectly given in the various records consulted, this fact should be mentioned in the letter.